**सं.फौ.ख.क्रं. ३१४/२०२४**
**सरकार वि. किशोर**
**नि.क्र. ०९ वर पुढे सुरु**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी</u>**

मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपूर्ण खरे सांगेन आणि खऱ्या शिवाय काहीही सांगणार नाही.

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | राजु ज्ञानेश्वर तिघरे, |
| वय सुमारे | : | ४८ वर्ष, व्यवसाय – मजुरी, |
| निवासस्थान | : | वलनी, तालुका पवनी, जिल्हा: भंडारा. |

**<u>शपथेवर सरतपास</u> – <u>सहा</u>. <u>सरकारी वकील श्री. एन. के. गणवीर साहेब यांचेमार्फत</u>–**

**१.** पोलीसांनी मला पंचनाम्याच्या कारवाईकरीता बोलावीले नव्हते. पोलीसांनी काही कागदपत्रांवर माझ्या सह्या मांगली रोडवर घेतल्या होत्या. आता मला सुचनापत्र, घटनास्थळ पंचनामा आणि जप्तीपंचनामा दाखवीण्यात आले. त्यावर माझ्या सह्या आहेत. त्यातील मजकुर मला माहीत नाही.

**सरतपास पुर्ण.**

**<u>साक्षदार सरकार पक्षाला सहाय्य करत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरून साक्षदाराची उलट तपासणीची परवाणगी देण्यात आली</u>.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १७/०३/२०२४ रोजी मौजा वलनी येथे पोलीसांनी मला आरोपीच्या घरी पंचनाम्याच्या कारवाईकरीता बोलावीले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी आरोपीच्या घरून देशी दारूने भरलेले प्रत्येकी १८० एम.एल. चे ०८ पव्वे जप्त केले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यातील १ पव्वा वेगळा काढुन पोलीसांनी मला त्याचा वास दिला व तो सिलबंद केला. पंचनामे मी वाचुन पाहिले नव्हते. पंचनाम्यांवर मी वाचुन सह्या केल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवीण्याकरीता मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

<u>**उलट तपास आरोपीतर्फे वकील श्री. गोस्वामी साहेब यांनी नाकारला.**</u>

समक्ष

स्वा/–
**(व्ही. आर. फरकूंडे)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे. (न्या.क्र. २), पवनी.
**११/०४/२०२५**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/–
**(व्ही. आर. फरकूंडे)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., (न्या.क्र. २)पवनी.
**११/०४/२०२५**